**Publication:** Saamna
**Date:** 26/10/2015
**Edition:** Mumbai
**Page No:** 7
**Headline:**Podar School wins quiz competition



# प्रश्नमंजुषा स्पर्धेत पोदार स्कूल विजयी

'टीसीएस आयटी विझ' या आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धेत मुंबईतील आर.एन.पोदार स्कूल विजयी झाले आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या आयटी क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा होती. अंतिम फेरीत पोदार स्कूलच्या अभिषेक मुठांगे, निखिल कुमार या विद्यार्थ्यांना पाच फेऱ्यांत प्रश्न विचारले होते. पाचही फेरीतील प्रश्नांची अचूक उत्तरे देत पोदार स्कूलचे हे विद्यार्थी विजयी ठरले. त्यांना आयपॅड एअर बक्षीस देण्यात आले. टाटा कन्सल्टन्सीचे मुख्य वित्त अधिकारी राजेश गोपीनाथन यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.